महाराष्ट्र शासन

क्रमांक : युजीएफ१०८९/११०/९६/विशि-२
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ ऑगस्ट, १९८९.

प्रति,

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

विषय : १९८९-९० या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभियांत्रिकी तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे महाविद्यालय उघडण्यास परवानगी देण्याबाबत.

महोदय,

१९८९-९० या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनाकडे परस्पर आलेल्या अर्जांचा विचार करून खाली नमूद केलेल्या संस्थेकडून १९८९-९० पासून अभियांत्रिकी तंत्रशास्त्र महाविद्यालय उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९७४ च्या कलम ४३ [४][अ][सी][२] अन्वये परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| नवीन महाविद्यालय उघडण्याचे ठिकाण | विद्याशाखा | संस्थेचे नांव |
| --- | --- | --- |
| वाशि, नविन मुंबई. | प्रथम वर्ष अभियांत्रिकी महाविद्यालय<br>१] पेट्रोलियम व पेट्रोकेमिकल<br>२] कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी.<br>३] बायो-मेडिकल इंजिनियरींग | महात्मा गांधी मिशन<br>१२ भाग्य नगर, नांदेड |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली पूर्व परवानगी ही शिक्षण व सेवायोजन विभागाच्या दिनांक क्रमांक : पीईसी १९८९/२५५१/तांशि-१[अ], दिनांक २१.८.८९ च्या पत्रातील अटीनुसार आहे.

३. विद्यापीठाने विद्यापीठ अधिनियमांतील कलम ४३ [५] अन्वये कार्यवाही करून स्थानिक चौकशी समिती, अॅकडमिक कौन्सिल, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल व सिनेट यांचा

INWARD NO: 1714
DATE: 7/3/91

...२

अहवाल शासनाकडे तात्काळ पाठवावा. त्यानंतर कलम ४३(६) व (७) नुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश निर्गमित करण्यात येईल.

आपला विश्वासू,

[ गो. वि. भाटम ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत, चेअरमन महात्मा गांधी मिशन, १२ भाग्यनगर, नांदेड यांस सदर महाविद्यालय उघडण्यास देण्यात येणारी परवानगी वरील परिच्छेद-२ मधील अटींवरच देण्यात आलेली आहे.

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन तांशि-१, शिक्षण व सेवायोजन विभाग.

शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयाअंतर्गत नवीन पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास शासनाची मान्यता देणेबाबत

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. टिइएम २००८/(३४३/०८)/तांशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक: ३१ जुलै, २००८

संदर्भ :- १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. ३३८२/१२८३६/(१९०)/तांशि-१, दिनांक २१.०५.१९८३

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे दिनांक २९.०६.२००८ रोजीचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे

**शासन निर्णय :** सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयात नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास सोबत जोडलेल्या परिशिष्ट - अ प्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट – अ मधील संस्थाना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ / घट करण्यास व नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहीत केलेल्या तसेच २१ मे १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणे संबधित संस्थेस बंधनकारक राहील.
२. शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून यापुढे विहीत करण्यात येणाऱ्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.
३. सदर अभ्यासक्रमाच्या सलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता / सलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.
४. संबधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.
५. सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशनियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

६. संबधित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने / संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया , नवी दिल्ली यांची विहीत मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

७. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra .gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून २००८०८०९१६२८०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भ. सं. कानखेडे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये. (संचालकामार्फत)
३. संबधित विद्यापीठे (संचालकामार्फत)
४. संबधित संस्था (संचालकामार्फत)

प्रत माहितीसाठी :

१ अतिरीक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा माळा, चंद्रलोक बिल्डींग , जनपथ, नवी दिल्ली ११० ००१.

२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरंस बिल्डींग, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

३. निवड नस्ती/तांशि-१

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २७ | महाराष्ट्र अॅकेडमी ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड एज्युकेशनल रिसर्च एमआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सर्वे नं. १२४, एक्स सर्व्हिसमन कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे ४११ ०३८ | १ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | १२० | १२० |
| | | २ | इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ९० | ९० |
| | | ३ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | १२० | १२० |
| | | ४ | एमबीए | ६० | ६० |
| | | ५ | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ९० | ९० |
| | | ६ | एमई (व्हीएलएसआय अँड एम्बेडेड सिस्टीम) (नवीन अभ्यासक्रम) | ०० | १८ |
| | | ७ | एमई (इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी) (नवीन अभ्यासक्रम) | ०० | १८ |
| | | | | ४८० | ५१६ |
| २८ | महात्मा एज्युकेशन सोसायटीचे पिल्लाईज इन्स्टिट्युट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी इंजिनिअरींग, मिडीया स्टडीज अँड रिसर्च, १० सेक्टर १६, पीओडीआय २,न्यु पनवेल, रायगड ४१० २०६ | १ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | १२० | १२० |
| | | २ | इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ३ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | १२० | १२० |
| | | ४ | मॅकेनिकल इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ५ | इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ६ | एमई इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी (नवीन अभ्यासक्रम) | ०० | १८ |
| | | ७ | एमई मेकॅनिकल इंजिनिअरींग (नवीन अभ्यासक्रम) | ०० | १८ |
| | | | | ४२० | ४५६ |
| २९ | महात्मा गांधी मिशनचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, अॅट जंक्शन ऑफ एनएच ४, सायन पनवेल हुलगती मार्ग, कामोठे, नवी मुंबई, ठाणे ४१० २०९ | १ | बायो मेडीकल इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | २ | केमिकल इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ३ | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ४ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ९० | ९० |
| | | ५ | इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | ६ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ४० | ४० |
| | | ७ | बायो टेक्नॉलॉजी (नवीन अभ्यासक्रम) | ०० | ६० |
| | | ८ | एमई बायो मेडीकल इंजिनिअरींग | १८ | १८ |
| | | ९ | एम ई सिव्हील इंजिनिअरींग (स्ट्रक्चर) | १८ | १८ |
| | | १० | एमई कॉम्प्युटर इंजिनिअरींग | १८ | १८ |
| | | ११ | एमई मेकॅनिकल इंजिनिअरींग (केमिकल) (नवीन अभ्यासक्रम) | ०० | १८ |
| | | १२ | एमई मेकॅनिकल इंजिनिअरींग (ई अॅण्ड टी सी) (नवीन अभ्यासक्रम) | ०० | १८ |
| | | | | ४२४ | ५२० |

**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेले अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. सीटीसी-२०११/(२४१/२०११)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ५ ऑगस्ट, २०११.

संदर्भ : मा. उच्च न्यायालयाची रिट याचिका (एसटी) क्र. २०४७०/२०११ या प्रकरणी दिलेले आदेश.

**प्रस्तावना :** रिट याचिका क्र. ८८४७/२००७ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर प्राप्त झालेले कायदेविषयक अभिप्राय, इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाने शैक्षणिक वर्ष २०११-१२ करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०११ पर्यंत मान्यता दिलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये प्रवेशप्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात आले व त्यानुसारच शासनाचे आदेश देखील निर्गमित करण्यात आले आहेत. दिनांक ३० जून, २०११ नंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झालेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये प्रवेश प्रक्रिया न राबविता त्यांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रवेश प्रक्रिया राबविणे शासनास अभिप्रेत आहे. परंतु महात्मा गांधी मिशनचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सायन पनवेल महामार्ग, सेक्टर-१८, कामोठे, नवी मुंबई या महाविद्यालयाला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०११ नंतर मान्यता दिल्याने संस्थेने मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका (एसटी) क्र. २०४७०/२०११ दाखल केली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिनांक ३.८.२०११ रोजी संस्थेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यास अनुसरुन महात्मा गांधी मिशनचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सायन पनवेल महामार्ग, सेक्टर-१८, कामोठे, नवी मुंबई या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून प्रथम पाळीत इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग हा अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम ६० प्रवेशक्षमतेसह व द्वितीय पाळीत मेकॅनिकल इंजिनिअरींग हा अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम ६० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास तसेच प्रथम पाळीत इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ६० वरुन १२० पर्यंत वाढविण्यास शासनाची मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** महात्मा गांधी मिशनचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सायन पनवेल महामार्ग, सेक्टर-१८, कामोठे, नवी मुंबई या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून प्रथम पाळीत इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग हा अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम ६० प्रवेशक्षमतेसह व द्वितीय पाळीत मेकॅनिकल इंजिनिअरींग हा अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम ६० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास तसेच प्रथम पाळीत इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ६० वरुन १२० पर्यंत वाढविण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरीत्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यांत भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

९) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक नाहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

<u>प्रत माहितीसाठी</u> :-

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
निवडनस्ती

DTE, Mumbai

Variation in Intake for academic year 2012 as per AICTE communication on 14, 26 28 Jun 2012 [Under Graduate Course Post Graduate Courses]

| Inst Code | Name of the Institute | Course Type Name | Course Type Details | CourseName | Course Start Year | 2011-2012 | 2012-2013 | Diff |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3148 | Mahavir Education Trust's Shah & Anchor Kutchhi Engineering College, Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Electronics and Telecommunication Engg | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3148 | Mahavir Education Trust's Shah & Anchor Kutchhi Engineering College, Mumbai | Bachelor of Engineering (Direct Second Year) | Regular First Shift | Computer Engineering | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3150 | Taheri Scholarship Society Institute of Management Studies & Research, Mumbai | Post Graduate Diploma | Part Time First Shift | Post graduate Certificate in Management | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3150 | Taheri Scholarship Society Institute of Management Studies & Research, Mumbai | Post Graduate Diploma | Part Time First Shift | Post Graduate Diploma in Management(Healthcare & Hospital) | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3154 | Saraswati Education Society's Saraswati College of Engineering,Kharghar Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Mechanical Engineering | 2004 | 90 | 120 | 30 |
| 3154 | Saraswati Education Society's Saraswati College of Engineering,Kharghar Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular Second Shift | Mechanical Engineering | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3155 | Yashwantrao Chavan Shikshan Prasarak Mandal's Sinhgad Institute of Business Management, Chandivali | M.B.A./M.M.S. | Regular First Shift | M. M. S. | 2009 | 180 | 300 | 120 |
| 3156 | Dilkap Research Centre & Institute of Management Studies,Mamdapur,Neral,Near Karjat | M.B.A./M.M.S. | Regular First Shift | M. B. A. | 2009 | 120 | 60 | -60 |
| 3157 | Shree Ghatkopar Sarvajanik Jivdaya Khatur's Aruna Manharlal Shah Institute of Management & Research, Ghatkopar | P.G.D.M. | Regular First Shift | Executive | 2010 | 60 | 0 | -60 |
| 3160 | Mahatma Edu.Soc.'s Pillai's HOC Institute of Management studies & research, Raigad | M.B.A./M.M.S. | Regular First Shift | M. M. S. | 2009 | 120 | 180 | 60 |
| 3160 | Mahatma Edu.Soc.'s Pillai's HOC Institute of Management studies & research, Raigad | P.G.D.M. | Regular First Shift | Executive | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3167 | Mumbai Education Trust's Institute of Computer Science, Bandra (W), Mumbai | P.G.D.M. | Regular First Shift | E-Business | 2012 | 0 | 120 | 120 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Master of Engineering (M. E.) | Regular First Shift | Information Technology | 2012 | 0 | 18 | 18 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Master of Engineering (M. E.) | Regular First Shift | Instrumentation Engineering | 2012 | 0 | 18 | 18 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Information Technology | 1999 | 60 | 120 | 60 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Instrumentation Engineering | 1998 | 60 | 120 | 60 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular Second Shift | Electronics and Telecommunication Engg | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3175 | M.G.M.'s College of Engineering and Technology, Kamothe, Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Computer Engineering | 1988 | 90 | 120 | 30 |
| 3175 | M.G.M.'s College of Engineering and Technology, Kamothe, Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Information Technology | 2001 | 40 | 60 | 20 |
| 3176 | Thakur College of Engineering and Technology, Kandivali, Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Mechanical Engineering | 2012 | 0 | 120 | 120 |
| 3185 | Vivekanand Education Society's Institute of Technology, Chembur, Mumbai | Master in Computer Application (M.C.A.) | Regular First Shift | Master in Computer Application | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3185 | Vivekanand Education Society's Institute of Technology, Chembur, Mumbai | Master in Computer Application (M.C.A.) | Regular Second Shift | Master in Computer Application | 2012 | 0 | 60 | 60 |

शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एमबीए/एमसीए महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र संकिर्ण-२०१०/(१८८/२०१०)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ ऑगस्ट, २०१०.

संदर्भः- १) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/एनजीसी/अभातंशिप-यादी/शा.मान्यता/२०१०/१२४१, दिनांक ३० जून, २०१०.
२) शासनाचा समक्रमांक दिनांक ३० जुलै, २०१० चा शासन निर्णय.
३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/डीटीई/२०१०/१३४३, दिनांक २७ जुलै, २०१०.
४) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०१०/१५०५, दिनांक ११ ऑगस्ट, २०१०.
५) शासनाचे पत्र क्र. टीईएम २०१०/(१८८/२०१०)/तांशि-४, दि. १७.८.२०१०.
६) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/वाढ/घट/२०१०/१५८९, दिनांक २३ ऑगस्ट, २०१०.

**शासन निर्णय :** शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एमबीए/एमसीए महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास सोबत जोडलेल्या **परिशिष्ट 'ब'** प्रमाणे सुधारित मान्यता त्यांच्या दिनांक ९.८.२०१० च्या इ-मेल संदेशाद्वारे दिलेली आहे. सदर माहिती संचालक, तंत्र शिक्षण यांनी शासनास त्यांच्या दिनाक ११.८.२०१० च्या पत्रान्वये शासनास सादर केली असून त्यास शासनाची मान्यता देण्याबाबत विनंती केली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत **जोडलेल्या परिशिष्ट 'ब' मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास व** अतिरिक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे:

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

८) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

९) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने यापूर्वी दिनांक २७ जुलै, २०१० रोजीच्या पत्रान्वये मान्यतेसंदर्भात सादर केलेली माहितीवर संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक तो शासन निर्णय दिनांक ३० जुलै, २०१० रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. त्या शासन निर्णयाच्या परिशिष्ट 'अ' मध्ये समाविष्ट असलेल्या काही संस्थांचा अंतर्भाव या शासन निर्णयाच्या परिशिष्ट 'ब' मध्ये करण्यात आलेला आहे. अशा समान संस्थांबाबत या शासन निर्णयाच्या परिशिष्ट 'ब' येथील मान्यता सुधारित समजण्यात यावी.

४. परिशिष्ट 'ब' येथे दर्शविलेल्या सर्व संस्थांचे सविस्तर पत्ते व विद्यापीठ यांची माहिती प्र. संचालकांनी शासनास ८ दिवसांत सादर करावी.

५. विद्यार्थ्यांना तसेच पालकांना व शैक्षणिक संस्थांना, अभ्यासक्रम, प्रवेशक्षमता व संस्थेचा पत्ता इत्यादी संदर्भात काही शंका असल्यास त्यांचे निरसन संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (संचालकांमार्फत)
कुलसचिव, (संचालकांमार्फत)
संबंधित संस्था

**प्रत माहितीसाठी**
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती / तांशि-४

परिशिष्ट- [illegible]

| Application No | State | Institute Name | Program | Level | Shift | Course | Intake (2009-10) | Applied Intake (2010-11) | Approved Intake (2010-11) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1-8068011 | MAHARASHTRA | JSPM'S Rajarshi Shahu College of Engineering | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | Computer Engg. | 60 | 60 | 60 |
| 1-8068011 | MAHARASHTRA | JSPM'S Rajarshi Shahu College of Engineering | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | Information Technology | 60 | 60 | 60 |
| 1-8068011 | MAHARASHTRA | JSPM'S Rajarshi Shahu College of Engineering | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | Mechanical Engg. | 120 | 120 | 120 |
| 1-8068011 | MAHARASHTRA | JSPM'S Rajarshi Shahu College of Engineering | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | Civil Engg. | 60 | 60 | 60 |
| | | | | | | | | | |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Post Graduate | First Shift | Electronics and Telecommunication | 18 | 18 | 18 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Post Graduate | First Shift | BIOMEDICAL ENGINEERING | 18 | 18 | 18 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Post Graduate | First Shift | CHEMICAL ENGINEERING | 18 | 18 | 18 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Post Graduate | First Shift | COMPUTER ENGINEERING | 18 | 18 | 18 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Post Graduate | First Shift | CIVIL TECHNOLOGY | 18 | 18 | 18 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | BIOMEDICAL ENGINEERING | 60 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | BIO TECHNOLOGY | 60 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY. | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | CHEMICAL ENGINEERING | 60 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | COMPUTER ENGINEERING | 90 | 90 | 90 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | INFORMATION TECHNOLOGY | 60 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | CIVIL TECHNOLOGY | 60 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | ELECTRONICS& TELE.COMM.ENGINEERING | 60 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | Mechanical Engg | 0 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | Second Shift | Civil engg | 0 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | Second Shift | ETC | 0 | 60 | 60 |
| 1-12120544 | MAHARASHTRA | M.G.M'S ENGINEERING &TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | Second Shift | CSE | 0 | 60 | 0 |
| | | | | | | | | | |
| 1-40806801 | MAHARASHTRA | Aditya College of MBA | Management | Post Graduate | First Shift | MBA | 60 | 120 | 120 |
| | | | | | | | | | |
| 1-4685541 | Maharashtra | Vidyabharti College of Pharmacy | Pharmacy | Under Graduate | First Shift | B Pharm | 60 | 60 | 60 |
| 1-4685541 | Maharashtra | Vidyabharti College of Pharmacy | Pharmacy | Post Graduate | First Shift | Pharmaceutics | 10 | 18 | 18 |
| 1-4685541 | Maharashtra | Vidyabharti College of Pharmacy | Pharmacy | Post Graduate | First Shift | Pharmacology | 0 | 18 | 18 |
| 1-4685541 | Maharashtra | Vidyabharti College of Pharmacy | Pharmacy | Post Graduate | First Shift | Pharma Chemistry | 0 | 18 | 0 |
| | | | | | | | | | |
| 1-6754941 | MAHARASHTRA | MATOSHRI PRATISHTHAN GROUP OF INSTITUTIONS SCHOOL OF ENGINEERING & MANGEMENT | MANAGEMENT | Post Graduate | First Shift | MBA | 60 | 120 | 120 |
| 1-6754941 | MAHARASHTRA | MATOSHRI PRATISHTHAN GROUP OF INSTITUTIONS SCHOOL OF ENGINEERING & MANGEMENT | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | CIVIL | 60 | 60 | 60 |
| 1-6754941 | MAHARASHTRA | MATOSHRI PRATISHTHAN GROUP OF INSTITUTIONS SCHOOL OF ENGINEERING & MANGEMENT | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | MECHANICAL | 60 | 120 | 120 |
| 1-6754941 | MAHARASHTRA | MATOSHRI PRATISHTHAN GROUP OF INSTITUTIONS SCHOOL OF ENGINEERING & MANGEMENT | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | COMPUTER SCIENCES & ENGG | 60 | 60 | 60 |
| 1-6754941 | MAHARASHTRA | MATOSHRI PRATISHTHAN GROUP OF INSTITUTIONS SCHOOL OF ENGINEERING & MANGEMENT | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | ELECTRICAL & TELECOMMUNICATION | 60 | 120 | 120 |
| 1-6754941 | MAHARASHTRA | MATOSHRI PRATISHTHAN GROUP OF INSTITUTIONS SCHOOL OF ENGINEERING & MANGEMENT | ENGINEERING AND TECHNOLOGY | Under Graduate | First Shift | ELECTRICAL & ELECTRONICS ENGG | 0 | 60 | 0 |

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/ एमसीए /पीजीडीएम महाविद्यालयातील नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ व घट करण्यास शासन मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. टीईएम-२०१२/प्र.क्र.९८(भाग-१)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० जून, २०१२

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई यांना दि.१४.०६.२०१२ रोजी तसेच दि.२६.०६.२०१२ रोजी आणि २८.०६.२०१२ रोजी पाठविलेले ई-मेल संदेश.

२) संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांनी शासनास सादर केलेले पत्र क्र.२/एनजीसी/अभ्यासक्रम व प्रवेशक्षमताबदल/मान्यता/२०१२/६८९, दिनांक २०.०६.२०१२

३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या क्र.२/एनजीसी/अभ्यासक्रम व प्रवेशक्षमताबदल/मान्यता/२०१२/७३७, दिनांक ३०.०६.२०१२

**शासन निर्णय :** शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/ एमएमएस/ एमसीए/ पीजीडीएम महाविद्यालयातील नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ व घट करण्यास सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे मान्यता दिलेली आहे. सदर माहिती संचालक, तंत्रशिक्षण यांनी शासनास त्यांच्या दिनांक ३० जून, २०१२ च्या पत्रान्वये सादर केलेली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास व अतिरिक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकाररित्या करण्यात येईल.

D:\GR\desk 4\2012-13\variation in intake.doc

३) सदर अभ्यासक्रमाच्या सलग्नीकरणास संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम ...
मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/सलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरून इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युतर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

८) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

९) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१०) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या /करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

(भ. सं.वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, (संचालकामार्फत)
सर्व विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालकांमार्फत)
सर्व संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

प्रत माहितीसाठी सादर -
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली- ११० ००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरंस बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.

## Courses - Institute-1(Sh 1 & 2)

| Programme | Level of course | Department | Shift | Approved Intake 10-11 | Year Started | Accreditation Status | Intake Applied for 11-12 | Approved Intake 11-12 | Application | Number of Faculty | State/Govt Recommendation | Univ/Board Recommendation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | BIOMEDICAL ENGINEERING | 1st Shift | 60 | 2010 | ACCREDITED | 60 | 60 | EoA Only | 14 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | POST GRADUATE | ELECTRONICS & TELE-COMMUNICATION ENGINEERING | 1st Shift | 18 | 2010 | ACCREDITED | 18 | 18 | EoA Only | 2 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | CHEMICAL ENGINEERING | 1st Shift | 60 | 2010 | NOT ACCREDITED | 60 | 60 | EoA Only | 12 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 1st Shift | 90 | 2010 | ACCREDITED | 90 | 90 | EoA Only | 15 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | INFORMATION TECHNOLOGY | 1st Shift | 40 | 2010 | ACCREDITED | 40 | 40 | EoA Only | 13 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 1st Shift | 60 | 2010 | ACCREDITED | 60 | 60 | EoA Only | 14 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 1st Shift | 60 | 2010 | NOT ELIGIBLE | 60 | 60 | EoA Only | 3 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | ELECTRONICS & TELE-COMMUNICATION ENGINEERING | 2nd Shift | 60 | 2010 | NOT ELIGIBLE | 60 | 60 | EoA Only | 3 | Recommended | Applied |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 2nd Shift | 60 | 2010 | NOT ELIGIBLE | 60 | 60 | EoA Only | 3 | Recommended | Applied |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | 1st Shift | 60 | 2010 | ACCREDITED | 120 | 120 | EoA & Increase in Intake | 16 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | ELECTRICAL ENGINEERING | 1st Shift | 0 | 2010 | NOT APPLICABLE | 60 | 60 | Application for new course | | Yet to apply | Yet to apply |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 2nd Shift | 0 | 2010 | NOT APPLICABLE | 60 | 60 | Application for new course | | Yet to apply | Yet to apply |

| Programme | Level of course | Department | Shift | Approved Intake 10-11 | Year Started | Accreditation Status | Intake Applied for 11-12 | Approved Intake 11-12 | Application | Number of Faculty | State/Govt Recommendation | Univ/Board Recommendation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ENGINEERING AND TECHNOLOGY | POST GRADUATE | BIOMEDICAL ENGINEERING | 1st Shift | 18 | 2010 | ACCREDITED | 18 | 18 | EoA Only | 3 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | POST GRADUATE | CHEMICAL ENGINEERING | 1st Shift | 18 | 2010 | ELIGIBLE-NOT APPLIED | 18 | 18 | EoA Only | 2 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | POST GRADUATE | CIVIL ENGINEERING | 1st Shift | 18 | 2010 | ACCREDITED | 18 | 18 | EoA Only | 2 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | POST GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 1st Shift | 18 | 2010 | ACCREDITED | 18 | 18 | EoA Only | 2 | Recommended | Recommended |
| ENGINEERING AND TECHNOLOGY | UNDER GRADUATE | BIOTECHNOLOGY | 1st Shift | 60 | 2010 | NOT ACCREDITED | 60 | 60 | EoA Only | 10 | Recommended | Recommended |

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यातील विद्यमान संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रम बंद करण्यास व प्रवेशक्षमतेत घट करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेस अनुसरुन शासनाची मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र.२१०/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०१ जून, २०१८

संदर्भ :- संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/ एनजीसी /मान्यता/२०१८/६३४, दि. १९.०५.२०१८.

प्रस्तावना :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत दिनांक १४.०५.२०१८ रोजी ई-मेलद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या यादीनुसार संचालक, तंत्रशिक्षण यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये विद्यमान अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमटीसीटी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी, पदव्युत्तर पदवी संस्थेतील अभ्यासक्रम बंद करण्यास व विद्यमान अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमेत घट करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून शासन मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी Annexure A मधील ६८ अभ्यासक्रम बंद करणे/सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट करण्यास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून मान्यता दिलेली आहे. तर Annexure " B" मधील १८९ विद्यमान अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता कमी करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये सध्याच्या प्रवेशक्षमतेत एकूण १०,२९५ घट अपेक्षित असल्याचे संचालक, तंत्र शिक्षण यांनी नमूद केले आहे .

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिनांक १४.०५.२०१८ रोजी ई-मेलद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या यादीच्या अनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सोबतच्या Annexure A व Annexure B मधील संस्थाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रम बंद करण्यास व विद्यमान अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत घट करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष

२०१८-१९ पासून सोबतच्या Annexure A व Annexure B मधील संस्थाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रम बंद करण्यास व विद्यमान अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत घट करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

